# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र १२४** **दिनांक- १२/०५/२०२१**

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने होम डीलेव्हरीच्या नावाखाली बेकादेशीररित्या देशी /विदेशी दारु विक्री करीत असतांना एका इसमास केली अटक.**

दिनांक ११.०५.२०२१ रोजी १३.३० वा.चे सुमारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत, गोल्डन स्टार वाईन शॉप, मिरा-भाईंदर रोड, बेव्हर्ली पार्क, मिरारोड पूर्व या वाईन शॉपचे मालक/चालक हे त्यांच्या काऊंटर बॉय व डिलेव्हरी बॉय यांच्या मदतीने लॉकडाऊनच्या काळात चढया भावाने देशी /विदेशी दारुची बेकायदेशीर विक्री, दुकानाचे जवळपास असलेले, मॅकडोनल्स जवळील बस स्टॉपजवळ येवून करीत असल्याची बातमी मिळाली.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पोलीस पथकासह मॅकडोनल्स समोरील बस स्टॉप पासुन काही अंतरावर सापळा लावला. सापळा कारवाईमध्ये एक इसम त्याच्या पाठीवर काळया रंगाची सॅकबॅग लटकवून ॲक्टीवा मोटर सायकलवरुन स्टार वाईन शॉप, येथुन बस स्टॉपच्या दिशेने येताना दिसला. पंचासमक्ष पोलीस पथकाने सदर इसमास घेराव घालुन मॅकडॉनल्स बस स्टॉपसमोर १५.१० वा. जागीच थांबवून त्याच्या पाठीवर लटकविलेली काळया रंगाची बॅग तपासली असता, त्याच्या बॅगमध्ये देशी / विदेशी दारुच्या बाटल्या मिळुन आल्या त्याचेजवळ दारु बाळगण्याचा वैध परवान्याची मागणी केली असता त्याचेकडे दारु विक्री करण्याचा / बाळगण्याचा परवाना नसल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी सविस्तर चौकशी केली असता सदर इसमाने त्याचे नाव **प्रख्यात रमेश शेटटी** वय २४ वर्ष रा. १०२, निरवपार्क, बेव्हर्ली पार्क, मिरारोड पूर्व असे असल्याचे सांगितले. त्याचेक्डे मिळुन आलेल्या बॅगमध्ये, London pilsner premium strong_नावाच्या ७ बाटल्या, Imperial Blue, ५ बाटल्या, McDowells no-1 ३० बाटल्या, देशी दारु, जी.एम.लिंबु पंच, २०बाटल्या, देशी दारु संत्र, २०बाटल्या असा एकुण ८,३६५/- रु किमतीचा देशी विदेशी दारुचा माल मिळून आला. विक्री करण्यासाठी आयसीआयसीआय बॅकेचे डेबीट/क्रेडीट स्वॅब मशिन,रोख रक्कम व डिलेव्हरी करण्यासाठी वापरण्यात आलेली ॲक्टीव्हा मोटर सायकल तसेच सर्व दारुच्या बाटल्या असा एकुण २८,८६५/- रु किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे .त्याचे विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे पोहवा.२२६९ उमेश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. १९२/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई), अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त, (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त,(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदर तसेच अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे अंमलदार पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा.१६३ राचंद्र पाटील, पो.शि/३६६० शिंदे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner